
भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्राचे योगदान





संपादक
डॉ. संदीप नामदेव मिरे
सह-संपादक
प्रा. गहिनीनाथ लिंबराज शेळके
प्रा. सोपान लक्ष्मण नवथर

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी-फोटोकॉपिंग, रेकार्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या आणि लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

ISBN 978-93-94800-16-8

पुस्तक : भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्राचे योगदान

संपादक : डॉ. संदीप नामदेव मिरे

सह-संपादक : प्रा. गहिनीनाथ लिंबराज शेळके

प्रा. सोपान लक्ष्मण नवथर

प्रकाशक : **निशा पब्लिकेशन एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स**

120/742 नारायणपुरवा, कानपुर

Email : nishapublication123@gmail.com

Mob. : 9506361570

संस्करण : प्रथम, 2023

© : संपादक

मूल्य : 500/-

शब्द-सज्जा : रुद्र ग्राफिक्स, कानपुर

मुद्रक : सार्थक प्रिंटर्स, कानपुर

आर्थिक अनुदान : *भारतीय समाज विज्ञान संशोधन परिषद, न्यू दिल्ली*

अनुक्रमणिका

१. तुफान सेनेचे स्वातंत्र्य लढ्यातील कार्य
डॉ. मधुकर विठोबा जाधव १७

२. बाबुजी आव्हाड यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान
प्रा. डॉ. अशोक कडूभाऊ कानडे २४

३. भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील पाथर्डीचे योगदान
प्रा. डॉ. केरकळ अर्जुन शंकर २९

४. अहमदनगर जिल्हयातील कम्युनिस्ट चळवळीत माजी खासदार कॉम्रेड चंद्रभान बाळाजी आठरे पाटील यांचे योगदान
प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे, प्रा. सोपान नवथर ३५

५. वऱ्हाड प्रांतातील कायदेभंगाची चळवळ (1932.34)
प्रा. डॉ. निलय देशमुख ४२

६. स्वातंत्र्य चळवळीतील विदर्भातील व्यक्तिमत्व डॉ.म.ना.पारसनीस
डॉ. नामदेव वामनराव ढाले ४८

७. महाराष्ट्रातील आदिवासी क्रांतिकारक–हुतात्मा नाग्या कातकरी आणि राघोजी भांगरे
डॉ. प्रकाश बुवाजी पांढरमिसे ६४

८. कॉम्रेड एस.व्ही.देशपांडे व कॉम्रेड एस.एस.मिरजकर यांचे अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षामधील भूमिका व कार्य
प्रा. डॉ. विधाटे गणेश शंकर ६८

९. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात कोकणचे योगदान
प्रा. डॉ. सोमनाथ दत्तात्रय कदम ७५

१०. महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळ व 'काळ' वृत्तपत्र
प्रा. आसाराम हरिभाऊ देसाई ८२

११. महाराष्ट्रातील 1857 चा पेठ (नाशिक) मधील देवजी राऊत संघर्ष : राष्ट्रवादी परिप्रेक्ष्य : एक चिकित्सक अभ्यास
डॉ. एस.आर. थोरवत ८६

१२. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्रातील क्रांतीकारकांचे योगदान (वासुदेव बळवंत फडके व चाफेकर बंधू यांच्या विशेष संदर्भाने)
प्रा. डॉ. महादेव शामराव थोरात ९२

१३. कामगार चळवळीतील नारायण मेघाजी लोखंडे यांचे योगदान
प्रा. डॉ. काकडे बी. जे.
प्रा. गंडाळ ए.टी. ९७
१४. भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील महाराष्ट्रातील महिलांचे योगदान
प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम १०१
१५. भारतीय स्वातंत्र्य लढा : महाराष्ट्रातील ज्ञानोदय वृत्तपत्राची भूमीका
डॉ. उषा विटकर १०९
१६. थोर स्वातंत्र्य सेनानी सहकारातील अग्रणी नेते बानाभाऊ सुकाळकर पाटील
प्रा. डॉ. सोनवणे राजाराम रामदास ११२
१७. भारतीय स्वातंत्र्य चळवळ व कामगार नेते ना. ग. गोरे यांची भूमिका
प्रा. शेळके गहिनीनाथ ११६
१८. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अहमदनगर जिल्ह्याचे योगदान
प्रा. नवथर सोपान लक्ष्मण १२१
१९. होमरूल चळवळीचे भारतीय स्वातंत्रलढ्यातील योगदान
स. प्रा. गडगे शांता रंगनाथ १९
२०. भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये महाराष्ट्रातील आदिवासी चळवळीचे योगदान
प्रा. शैलेश कुशेंद्र भालेराव १३४
२१. 'राष्ट्रवीर' साप्ताहिकाने भारतीय स्वातंत्र्यलढ्यात दिलेले वैचारिक योगदान
प्रा. विशाल रामदास रोकडे १३८
२२. आदिवासी जमातींचे इतिहास पुनर्लेखन करणे आधुनिक काळाची गरज आहे
श्री प्रकाश महादू गावित १४१
२३. भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये महाराष्ट्रातील आदिवासी व दलित चळवळीचे योगदान
चंद्रभागा शंकर उघडे १४६
२४. युगपुरुष–कॉम्रेड एकनाथराव भागवत साहेब
(कम्युनिस्ट पक्ष आणि चळवळी)
योगेश भास्करराव कवळे १५२
२५. भारतीय स्वातंत्र्य लढयामध्ये महाराष्ट्रातील महिलांचे योगदान
प्रविण अर्जुन गरुड १६२

२६. विदर्भातील थोर क्रांतिकारक : वीर हुतात्मा जगदेवराव पाटील
उमेश मनोहर राऊत १६७
२७. भारतीय स्वातंत्र्य चळवळ आणि महाराष्ट्रातील स्त्रिया
अश्विनी सुरेश गायकवाड १७६
२८. बाळासाहेब भारदे : एक थोर व्यक्तिमत्व
प्रा.राजेंद्र रामभाऊ काळे १८३
२९. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील मराठी साहित्याचे योगदान
श्री.चंद्रशेखर राजेंद्र मुरदारे १८६
३०. Dr. B.R. Ambedkar's Works for Humanity
Dr. Nalini Avinash Waghmare १९२
३१. Participation of Womens in Indian Freedom Movement : Special Reference to Maharashtra (1800 to 1947 A.D.)
Dr. Simon Yesu १९८
३२. Lahuji vastad Salve (1794-1881) : Pioneer of Maharashtra's Revolutionary Nationalism.
Dr. Suraj Laxman Sonawane २०७
३३. Indian Literature in the Age of Nationalism : Rise of Progressive Writers' Association
Dr. Meenakshi Tiwari २१२
३४. Revolutionary Element in the Indian Freedom Struggle - A Reflection
Dr . Maninder Arora २१९
३५. Re-visiting History : A Study of Indian Freedom Struggle as Represented in Select Postcolonial Indian Fiction
Dr. Hemant R. Gaikwad २२६
३६. Women's Role in The Indian Freedom Struggle
Dr. Deepak Sopan Vede २३४
३७. Translation, Late Nineteenth Century Maharashtra, and Imagining an Independent Nation into Existence
Dr. Kavita Patil २४२
३८. Contribution of Maharashtrian women to Indian Freedom Struggle
Nikita Gadre २५३

१४

भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील महाराष्ट्रातील महिलांचे योगदान

प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम

गोषवारा – आधुनिक भारतीय इतिहासात भारतीय स्वातंत्र्यलढ्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात थोर पुरुषांनी योगदान दिले. त्यांची कामगिरी आपणास परिचित आहे. परंतु भारतीय स्वातंत्र्यलढ्यात विशेषतः महाराष्ट्रातील ज्या कर्तृत्ववान स्त्रियांनी योगदान दिले, परंतु पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांना कुटुंब व समाजव्यवस्थेत नेहमी दुय्यम स्थान दिले गेले. पर्यायाने इतिहास लेखनामध्ये स्त्रियांच्या योगदानाची म्हणावी तितकी दखल घेण्यात आलेली नाही.

स्त्रियांच्या कर्तेपणाचा इतिहास जर आपण पाहिला तर अगदी स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्त्रियांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविलेला आहे. ब्रिटिशांनी भारतात आपली सत्ता प्रस्थापित केल्यानंतर पारतंत्र्य झुगारून देऊन, स्वातंत्र्य मिळविण्यासाठी विविध टप्प्यातून ब्रिटिश सत्तेविरुद्ध जो लढा दिला गेला, त्या प्रत्येक टप्प्यात महाराष्ट्रातील स्त्रियांनी सक्रिय सहभाग घेतलेला होता. राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनातील सहभागापासून ते क्रांतिकारी चळवळी, महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, तसेच भारत छोडो आंदोलन ते भूमिगत आंदोलन या सर्व टप्प्यावर स्त्रियांनी स्वतःला सिद्ध केले.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महाराष्ट्रातील काही निवडक स्त्रियांच्या योगदानाचा आढावा घेण्यात आलेला आहे. स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या परिप्रेक्ष्यातून ही मांडणी प्रामुख्याने केलेली आहे.

प्रास्ताविक

स्त्रीला मिळालेले दुय्यम स्थान हे जगभराच्या इतिहासाचा एक भाग मानले जाते. तिच्या या दुय्यम स्थानाचे मूळ आपणास पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत प्रामुख्याने पहावयास मिळते. स्त्रीच्या तुलनेत पुरुष हाच श्रेष्ठ आहे अशी या व्यवस्थेची धारणा असते. या पार्श्वभूमीवर कोणत्याही समाजात स्त्रियांना सामान्यतः कोणते हक्क किंवा अधिकार उपलब्ध असतात, त्यांनी कोणती कर्तव्ये पार पाडली

पाहिजेत असे त्यांच्यावर बंधन असते, हे हक्क व कर्तव्य त्यांच्याकडून कशा रीतीने कार्यान्वित होतात, या बाबींवर समाजातील स्त्रियांचा दर्जा अवलंबून असतो. या दृष्टिकोनातून कोणत्याही कालखंडातील समाजाने आपल्या वेळच्या स्त्रीला दिलेले स्थान विचारात घेणे आवश्यक वाटते. या पार्श्वभूमीवर विचार करता वैदिक काळ हा स्त्री स्वातंत्र्याच्या दृष्टीने सुवर्ण युगाचा कालखंड होता. या काळात स्त्रिया सर्व धार्मिक कार्यात सहभागी होत होत्या. तर मध्ययुगीन काळात स्त्रियांची मोठ्या प्रमाणात अवनती होत गेली. चूल आणि मूल या कर्तव्यामध्ये स्त्रीला बंदिस्त करण्यात आले. तिच्या कर्तृत्वाला कोणत्याही प्रकारचा अवकाश खुला नव्हता. परंतु इंग्रजांनी व्यापाराच्या निमित्ताने भारतात प्रवेश केल्यानंतर भारतीयांच्या आधुनिकीकरणाला सुरुवात झाली. त्यातूनच सामाजिक सुधारणा चळवळी उदयास आल्या. या सामाजिक सुधारणा चळवळींच्या माध्यमातून स्त्री जीवन विषयक प्रश्नांचा पुनर्विचार झाला. त्यातूनच स्त्रीमुक्तीला चालना मिळाली.

एकोणिसाव्या शतकात स्त्रियांना शिक्षण मिळू लागले. स्त्रियांनी सामाजिक सुधारणा चळवळीमध्ये मोलाचे योगदान दिले. तसेच राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात स्त्रिया प्रतिनिधित्व करू लागल्या. क्रांतिकारी चळवळींमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. तर विसाव्या शतकामध्ये महात्मा गांधीजींचा भारतीय राजकारणात उदय झाल्यानंतर स्त्रियांचा सार्वजनिक जीवनातील मार्ग मोकळा झाला. गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, छोडो भारत आंदोलन तसेच भूमिगत चळवळींमध्ये महाराष्ट्रातील काही निवडक स्त्रियांनी मोलाचे योगदान दिले. खरं तर या देशाला गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्य आंदोलनात पुरुषांबरोबर स्त्रियांनीही मोठा सहभाग घेतला होता. हे खरं असलं तरी स्वातंत्र्य मिळाल्यावर स्त्रियांच्या कामगिरीची म्हणावी तेवढी दखल घेतली गेली नाही. इतिहास लेखनात स्त्रियांची कामगिरी मोठ्या प्रमाणात दुर्लक्षित राहिली तर बरीचशी मर्यादित स्वरूपात मांडली गेली.

संशोधनाची उद्दिष्टे

१. भारतीय स्त्रीवादी विचार प्रवाहाच्या सैद्धान्तिक अधिष्ठानाचा अभ्यास करणे.

२. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांना प्राप्त झालेल्या दुय्यम स्थानाचे चिकित्सक विश्लेषण करणे.

३. राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात महाराष्ट्रातील स्त्रियांच्या सहभागाचा आढावा घेणे.

४. महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या जनचळवळीतील महाराष्ट्रातील निवडक स्त्रीयांच्या योगदानाची स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या परिप्रेक्ष्यातून मांडणी करणे.

संशोधन पद्धती– भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महाराष्ट्रातील निवडक स्त्रियांचे योगदान हा विषय आधुनिक कालखंडातील आहे. या विषयाच्या संशोधनासाठी ज्या काही ऐतिहासिक संशोधन पद्धती आहेत. त्यापैकी संदर्भ संशोधन पद्धतीचा वापर करून त्यामध्ये विश्लेषणात्मक पद्धतीचा मुख्यत्वे वापर करण्यात आलेला आहे.

भारतीय संदर्भात स्त्रीवादी विचार प्रवाह– भारतीय संदर्भात पा'चात्त्य स्त्रीवादी विचाराचा नेमका अर्थ कसा लावला गेला पाहिजे हा प्रश्न महत्त्वाचा आहे. भारतीय समाजाचे वास्तव लक्षात घेता एका अर्थाने आपला इतिहास नव्या दृष्टिकोनातून तपासून पाहण्याचा, त्यातील अदृश्य स्त्री जीवनाचा सहभाग उलगडून पाहण्याचा हा प्रयत्न असलेला दिसून येतो. त्यानुसार भारतीय स्त्रीवादाच्या मांडणीचे पहिले श्रेय ताराबाई शिंदे यांना जाते. थोडक्यात स्त्रीवाद म्हणजे, "स्त्रियांचे दुय्यमत्व निर्माण करणारे सत्तासंबंध कोणते? व या सत्तासंबंधांचा समाजातील जाती, वर्ग, वर्णासारख्या सत्तासंबंधाशी नेमके नाते काय? या प्रश्नांचा खोलवर शोध घेऊन या सत्ता संबंधांना विरोध करणाऱ्या विचार व कृतीला स्त्रीवादी म्हणता येईल."[१]

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महाराष्ट्रातील निवडक स्त्रियांचे योगदान– भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये सर्व वर्गातील स्त्रियांनी आपले योगदान दिले. परंतु त्यांच्या योगदानाची दखल म्हणावी तितक्या प्रमाणात घेतली गेलेली नाही. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्वातंत्र्यलढ्यात स्त्रीयांनी सहभाग घेतला. पारतंत्र्य झुगारून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या सर्वस्वाचे समर्पण करणाऱ्या महाराष्ट्रातील निवडक रणरागिणींच्या योगदानाचा आढावा पुढीलप्रमाणे–

राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनातील महाराष्ट्रातील निवडक महिलांचा सहभाग

काशिबाई कानिटकर– एकोणिसाव्या शतकामध्ये स्त्रियांच्या लेखनाच्या दृष्टीने स्त्रियांचे शिक्षण हीच सर्वात महत्त्वाची सुधारणा ठरली. स्त्री शिक्षणामुळे स्त्रिया स्वतःच्या स्थितीविषयी विचार करू लागल्या. नियतकालिकांतून स्पष्टपणे सुधारणेसंबंधी विचार मांडू लागल्या. यासंदर्भात स्त्रियांचा सामाजिक दर्जा या लेखात कृष्णकुमारी लिहितात, "स्त्रीजात केव्हाही श्रेष्ठ आहे पुरुषांनी त्यांना कमी लेखण्याचा कितीही अट्टहास केला तरी जगाच्या उद्धाराची गुरुकिल्ली ही अबला समजल्या जाणाऱ्या स्त्रीच्याच हाती आहे."[२] १८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाला महिलाही उपस्थित राहू लागल्या. पंडिता रमाबाई यांच्या नेतृत्वाखाली १९९२ साली बंगाल व महाराष्ट्रातून मिळून आठ ते दहा महिला काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाला हजर होत्या. घराच्या बाहेरील सार्वजनिक कामात भारतीय व महाराष्ट्रातील स्त्रीयांचे पहिले पाऊल अशा पद्धतीने पडले.

आधुनिक मराठी साहित्यातील आद्य लेखिका, तत्कालीन मनोरंजन, निबंधचंद्रिका, नवयुग, विविधज्ञानविस्तार इत्यादी मासिकांमधून काशिबाई कानिटकर यांचे लेखन प्रसिद्ध झाले. त्या प्रार्थना समाजातील सभांना जात असत. त्यामुळे त्यांना लिहिण्याची प्रेरणा मिळाली. स्त्रीला सोसाव्या लागणाऱ्या दुःखाची जाणीव त्यांनी वाचकांना करून दिली. पंडिता रमाबाईंबरोबर त्या राष्ट्रीय काँग्रेसच्या दुसऱ्या अधिवेशनाला हजर असणाऱ्या आठ महिला सदस्यांपैकी महाराष्ट्रातील एकमेव हिंदू महिला होत्या. त्या थिआसाफिस्ट होत्या.

अशाप्रकारे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाला उपस्थित राहून काशीबाई कानिटकर यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात आपले वैचारिक योगदान दिलेले दिसून येते.

येसूबाई सावरकर– महात्मा गांधीजींच्या भारतातील आगमनापूर्वीही महाराष्ट्रात नाशिक शहरात स्वदेशीची शिकवण देणारी एक महिला सभा होती. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या वहिनी येसू सावरकर ह्या या सभेच्या संस्थापिका होत्या. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्थापन केलेल्या अभिनव भारत या संघटनेतील कार्यकर्ते तुरुंगवास भोगत असताना त्यांच्या बायकांचे संघटन करून येसू वहिनींनी या स्त्रियांची 'आत्मनिष्ठ युवती संघटना' नावाची संघटना स्थापन केली. "या स्त्रियांनी स्वदेशीचे व्रत हाती घेतले. त्याचा प्रसार केला. बांगड्या विदेशी असल्याकारणाने हातात काचेची बांगडी घालणे या महिलांनी सोडून दिले. याशिवाय साखर विलायती म्हणून त्यावरही बहिष्कार टाकला. त्यावेळचे प्रसिद्ध कवी विनायक यांच्या देशभक्तीपर कवितांवर ब्रिटिश सरकारने बंदी घातली होती. परंतु या युवतींनी त्यांच्या कविता पाठ करून त्यांचा तोंडी प्रसार करून त्या लोकप्रिय करण्याचे मोठे देशकार्य केले."[३]

महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्रातील महिलांचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग– १९२० साली महात्मा गांधीजींचा भारतीय राजकारणात प्रवेश झाल्यानंतर जी राजकीय परिस्थिती निर्माण झाली तिचा भारतभरच्या स्त्रियांवर मोठा परिणाम झालेला होता. गांधीजींनी शिक्षणाबरोबरच स्त्रियांची सामाजिक कर्तव्येही समाजाच्या नजरेला आणून दिलेली होती. या संदर्भात महात्मा गांधीजींचे वैशिष्ट्य अधोरेखित करताना भा. ल. भोळे असे म्हणतात की, "गांधीजींचे वैशिष्ट्य असे की, तोपर्यंत केवळ समाजधुरिणांमध्ये आणि वरिष्ठ सामाजिक वर्तुळामध्ये साधक–बाधक चर्चेचा विषय ठरलेली स्त्री समस्यांचा विषय थेट जनसमुदायांमध्ये गांधीजींनी नेऊन ठेवला होता. केवळ अत्याचाराचा विरोध या सुधारणेच्या टप्प्यावर राहिलेला विचार त्यांनी स्त्रियांच्या मूलभूत मानवी अधिकारा पर्यंतच्या समग्र स्त्री स्वातंत्र्याच्या भूमिकेशी जोडलेला होता."[४]

महात्मा गांधीजींनी नवसमाज निर्मितीत स्त्रीची महत्त्वाची भूमिका स्पष्ट करून स्त्रियांना राजकीय, सामाजिक, उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन केले होते. त्यानुसार स्त्रिया सूतकताई, स्वदेशी प्रचार, निदर्शने, सत्याग्रह यामध्ये मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊ लागल्या. राजकीय क्षेत्राबरोबरच भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातही स्त्रिया हिरीरीने सहभागी होत होत्या.

यशोदाबाई भट– स्त्रियांनी स्थापन केलेल्या संस्थांमधून इतर स्त्रियांमध्ये राष्ट्रीय वृत्ती वाढीला लावण्याचे काम केले जात असे. कथा, कीर्तनामध्ये इतिहासातील वीरांच्या कथा वर्तमान परिस्थितीशी सुसंगतपणे जोडून श्रोत्यांसमोर मांडण्याचे काम स्त्रिया करीत. यापैकी यशोदा भट नावाची मुंबईतील एक महिला अशा प्रकारची कीर्तने करण्यात प्रसिद्ध होती. यशोदाबाई आपल्या लहानग्या मुलीला घेऊन सत्याग्रह करीत व तुरुंगात जात. सुरुवातीपासून मुंबई शहर स्वातंत्र्य आंदोलनाचे मुख्य केंद्र होते. महाराष्ट्रात तुलनेने स्त्रियांची सामाजिक स्थिती बरी असल्यामुळे मुंबईतील स्त्रिया स्वातंत्र्य आंदोलनात सर्वात पुढे होत्या. मोर्चे काढणे, प्रभातफेऱ्या काढणे, ही कामे तर नित्याची. मुंबईतील स्त्रियांनी देशसेविका संघाची स्थापना केली. या स्त्रिया केशरी रंगाच्या गोल साड्या नेसून रस्त्यावर संचलन करीत असत. बच्चुभाई वागळे, पेरिन कॅप्टन, किसन घुमटकर अशा कितीतरी मुली या संस्थेचा सदस्य होत्या.

मृणालिनी देसाई– मृणालिनी देसाई अवघ्या तीन वर्षांच्या असताना देशाच्या स्वातंत्र्यासाठी झटणारी बरीच माणसे त्यांच्या अवतीभोवती होती. परिणामी त्यांच्या मनामध्ये ब्रिटिशांविषयी द्वेषाची भावना निर्माण झाली. विदेशी मालावर बहिष्कार व स्वदेशीचा पुरस्कार यासाठी सामान्य जनता संघटित झाली होती. याच काळात हुतात्मा बाबू गेनू यांनी विदेशी मालाच्या ट्रक समोर दिलेले बलिदान हे सारे भीषण वास्तव मृणालिनीने वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षी अनुभवलेले होते. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या माहितीमुळे देशप्रेमाचे धडे, स्वदेशीचे बीज कुठेतरी नकळत त्यांच्या मनामध्ये रुजले जात होते. त्याचाच परिणाम की काय त्यांनी आपला विलायती फ्रॉक पेटत्या होळीत टाकला. स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. त्यासाठी त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला होता. मृणालिनी देसाई या ध्येयवादी विचारवंत आणि लढाऊ वृत्तीच्या होत्या. याशिवाय कादंबरी लेखनातून त्यांनी ऐतिहासिक, सामाजिक, विषय मांडले. महात्मा गांधी यांच्या विचारांचा आणि तत्त्वांचा पगडा त्यांच्या संपूर्ण जीवनावर होता.

स्वातंत्र्यलढ्यात त्या स्वयंप्रेरणेने सहभागी झाल्या असल्या तरी त्या मागे महात्मा गांधीजींची विचारधारा, तत्वनिष्ठ प्रेरणा होती. महात्मा गांधीजींच्या अलौकिक चरित्राचा ठसा त्यांच्या आचार विचारांवर, वृत्ती प्रवृत्तींवर खोलवर

उमटला होता. गांधी जन्मशताब्दीच्या निमित्ताने मृणालिनी ताईंनी वाचकांसमोर 'पुत्र मानवाचा' ही अभ्यासपूर्ण कादंबरी ठेवली. अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळवून त्यांनी अखिल जगताला स्तिमित केले. त्या महामानवाची चरित्रगाथा मांडून लोक शक्तीचा जागर व्हावा हा त्यांच्या लेखनामागील अंतर्गत हेतू असावा.

सत्यभामाबाई कुवळेकर– सत्यभामाबाई कुवळेकर शंभर वर्षांच्या इतिहासाच्या साक्षीदार होत्या. महात्मा गांधीजींच्या पहिल्याच भाषणाने प्रभावित होऊन त्यांनी स्वतःला स्वातंत्र्य चळवळीत झोकून दिले होते. सामान्य स्त्रीला चळवळीत आणण्यासाठी त्यांनी राष्ट्रीय युवती संघाची स्थापना केली. १९४० मध्ये वैयक्तिक सत्याग्रहात महाराष्ट्रातील पहिली महिला सत्याग्रही म्हणून त्यांची निवड करण्यात आली. महात्मा गांधीजींच्या भेटीनंतर त्यांनी हळूहळू गांधीप्रणीत विधायक कार्यक्रमात भाग घेण्यास सुरुवात केली. १९४४ पासून त्यांनी सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रीय कार्यक्रम राबविला होता.

अहिल्या रांगणेकर– अहिल्या रांगणेकर यांना समाजसेवेचा वसा वडिलांकडून मिळाला. त्यांचा जन्म ५ जुलै १९२२ रोजी ठाणे येथे झाला. फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असताना गांधीजींची १९४२ ची चले जाव चळवळ सरकारचा निषेध करण्यासाठी कॉलेजमधून विद्यार्थ्यांनी काढलेल्या मोर्चात त्या सामील झाल्या. त्याबद्दल त्यांना तुरुंगवास झाला. तुरुंगामध्ये सोफिया खान, मनिबेन पटेल, मृदुला साराभाई, अनुताई लिमये यांच्या सानिध्यात जणू त्यांनी समाजसेवेचे शिक्षणच घेतले. १९४३ मध्ये त्यांनी कम्युनिस्ट पार्टीचे सदस्यत्व घेतले. रशियन क्रांतीने प्रभावित होऊन त्या गिरणी कामगार युनियनमध्ये सामील झाल्या. ऑल इंडिया डेमोक्रॅटिक वुमन्स असोसिएशनचे कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले.

राजूताई बिरनाळे– प्रतिसरकार हे केवळ ब्रिटिश सत्तेला विरोध, ब्रिटिशांशी संघर्ष यासाठी निर्माण केले नव्हते तर आपल्याला हवे असलेले स्वराज्य कशा प्रकारचे असले पाहिजे याचे अत्यंत चांगले उदाहरण होते. याचा वैचारिक पाया महात्मा फुले यांच्या विचाराचा होता. तर त्याची प्रेरणा स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराची होती. त्यामुळे प्रतिसरकारच्या काळात बऱ्याच स्त्रियांना अतिशय सन्मानजनक वागणूक मिळाली होती. प्रतिसरकारला आपल्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी सशस्त्र सैन्य दलाची आवश्यकता भासू लागली. ही गरज पूर्ण करण्यासाठी सहकारी जी.डी.लाड, नागनाथ नायकवडी, अप्पासाहेब लाड, राजुताई बिरनाळे वाय. सी. पाटील यांनी भूमिगत पद्धतीने कार्य करून भारतीय स्वातंत्र्य चळवळीत आपले योगदान दिले.

हंसाताई पाटील– स्वातंत्र्य लढयावेळी ब्रिटिश साम्राज्याला आव्हान देणाऱ्या पत्री सरकारच्या साक्षीदार क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कन्या म्हणजे

हंसाताई पाटील होय. त्या दक्षिण महाराष्ट्रात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या प्रतिसरकारात सहभागी झाल्या. वांगी येथील डाक बंगला जाळणे, सुरली घाटातील खजिना लुटणे, या पद्धतीने त्यांनी आपले क्रांती कार्य घडवून आणले. हंसाताई पाटील यांनी स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्वातंत्र्यानंतरही जनतेच्या प्रश्नासाठी आंदोलने, मोर्चे काढून अन्यायाविरुद्ध लढा दिला. त्या लहानपणापासूनच अतिशय संघर्षमय जीवन जगल्या. संघर्षाच्या माध्यमातून आपलं अस्तित्व निर्माण करणे व टिकविण्याचे काम त्यांनी केले.

लीलाताई पाटील– लीलाताई पाटील या क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पत्नी सरकार अर्थात प्रतिसरकार मधील तुफान सेनेच्या सेनानी राहिल्या. महात्मा गांधींच्या प्रेरणेने स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेल्या लीलाताईंना वयाच्या अठराव्या वर्षी १९४० साली ब्रिटिशांनी वैयक्तिक सत्याग्रहाच्या आरोपाखाली धुळे येथील तुरूंगात डांबले. १९३७ ते १९४५ या कालावधीत लीलाताईंनी खादी, काँग्रेस विचार , सभासद नोंदणी, प्रभातफेरी, ग्रामसफाई, मजूर, शेतकरी संघटना इत्यादी सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेतला.

१९४२ च्या ऑगस्ट महिन्यात गांधीजींनी सर्व देशवासियांना दिलेली ऑगस्ट क्रांतीच्या आंदोलनाची हाक लिलाबाईं पर्यंत पोहोचली.

त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसह अमळनेर येथील न्यायालय, पोस्ट ऑफिस, व स्टेशन या ब्रिटिशांच्या मर्मस्थानावरा मोर्चा काढून या तीनही इमारतींची राखरांगोळी केली. लीलाताई हातात तिरंगा झेंडा घेऊन या आंदोलनाचे नेतृत्व करीत होत्या. येरवडा कारागृहातून सुटल्यानंतर त्यांनी भूमिगत होऊन क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या चळवळीत तुफान सेनेच्या महिला सैनिकांच्या सेनानी म्हणून नेतृत्व केले. या चळवळीत त्यांनी खांद्यावर बंदूक ठेवून क्रांतिसिंह नाना पाटलांची ग्रामराज्य संकल्पित चळवळ बळकट करण्याचा प्रयत्न केला. लीलाताई पाटील यांनी आपले पती उत्तमराव पाटील यांच्या मदतीने भूमिगत राहून महाराष्ट्रभर सामाजिक क्रांती पेटविण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्योत्तर काळात लीलाताईंनी स्त्री शिक्षण, स्त्री मुक्ती, सहकारी संघटना, स्त्री होमगार्ड इत्यादी सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान दिले.

निष्कर्ष

अशा प्रकारे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महाराष्ट्रातील निवडक महिलांनी राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनातील भागापासून ते महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखालील असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, 1942 ची भारत छोडो चळवळ तसेच प्रतिसरकारच्या माध्यमातून भूमिगत राहून क्रांती कार्य केलेले दिसून येते.

संदर्भ

१. कृष्णकुमारी, गृहलक्ष्मी, (मासिक), सप्टेंबर १९२७, पृ. १५.
२. शर्मिला रेगे, लेखसंग्रह, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, १९९८ पृ. ९७.
३. भा. ल. भोळे, शतकांतराच्या वळणावर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी सातारा, प्रथमावृत्ती, २००६, पृ.५५.
४. पद्मजा पाटील व शोभना जाधव, (संपा.),भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००६, पृ.१३.
५. न. ब. मोदी (संपा.) भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रिया, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९९०.
६. स्वाती कर्वे, स्त्री विकासाचे नवे क्षितीज, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००८.
७. परदेशी प्रतिमा, जातीव्यवस्था आणि स्त्रीमुक्ती, क्रांतिसिंह नाना पाटील, अकादमी, सातारा, १९१९.
८. सरल धारणकर, आधुनिक भारतातील स्त्री जीवन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००४.

इतिहास विभाग
बी. डी. काळे महाविद्यालय घोडेगाव,
तालुका– आंबेगाव, जिल्हा– पुणे
मोबाईल नंबर : ९५२७७९७६८६